आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
१५ सप्टेंबर २०२६ - मंगळवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- येत्या १५ ऑक्टोबरपासून २ हजार रुपयांपेक्षा अधिक रक्कम UPI द्वारे मिळाली तर मोठ्या व्यापाऱ्यांना ४ दशांश टक्के शुल्क द्यावं लागणार, व्यक्तिगत निधी हस्तांतर मात्र निःशुल्क राहणार

- सहकारी साखर कारखान्यांना सवलतीचं कर्ज देण्यासाठी ७३८ कोटी रुपयांच्या तरतुदीला राज्य मंत्रिमंडळाची मंजुरी / नगरपरिषद, पंचायत निवडणुकीचे अर्ज फेटाळल्यावर जिल्हा न्यायालयात आव्हान द्यायला बंदी

- केवळ विधिमंडळ पक्षात फूट पडली होती असा दावा कधीच केला नव्हता असा एकनाथ शिंदेच्या वकीलांचा सर्वोच्च न्यायालयात युक्तीवाद

- दिल्ली सरकार १० हजार विद्यार्थ्यांसाठी वसतीगृह उभारणार

**आणि**

- अफगाणिस्तान विरुद्धच्या टी २० मालिकेतल्या दुसऱ्या सामन्यात नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षणाचा भारताचा निर्णय

<><><><><>

येत्या १५ ऑक्टोबरपासून २ हजार रुपयांपेक्षा अधिक रक्कम UPI द्वारे जमा झाली तर मोठ्या व्यापाऱ्यांना ४ दशांश टक्के शुल्क MDR अर्थात मर्चंट डिस्काऊंट रेट द्यावा लागेल. ३ हजार रुपयांच्या व्यवहारासाठी १२ रुपये तर ५० हजार रुपयांच्या व्यवहारासाठी हे शुल्क २०० रुपये असेल. ७५ हजार आणि त्यावरील रकमेसाठी हे शुल्क कमाल ३०० रुपये आहे. ग्राहकांकडून व्यापारांना हे शुल्क वसूल करता येणार नाही, असं NPCI अर्थात National Payment Corporation of India नं स्पष्ट केलंय.

शेअर बाजार आणि म्युच्युअल फंडांमधील गुंतवणुकीचे व्यवहार UPI द्वारे केले तर त्यावर २ दशांश टक्के आणि कमाल ३०० रुपये शुल्क द्यावे लागेल. रेल्वे तिकीट खरेदी, वीम्याचा हप्ता भरणे, मोबाइल रिचार्ज, इंधन खरेदी, वीज बिल, महापालिका कर, गॅस बिलाची रक्कम २ हजार रुपयांपेक्षा अधिक असेल तर केवळ ५ रुपये शुल्क लागेल.

युपीआय द्वारे १ लाख रुपयांपर्यंतची रक्कम महिन्याला खात्यात जमा होणाऱ्या छोट्या व्यापाऱ्यांना हे शुल्क द्यावे लागणार नाही. त्याचप्रमाणे एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीला निधी हस्तांतरित करतानाही हे शुल्क द्यावे लागणार नाही. NPCI च्या आकडेवारीनुसार सध्या UPI द्वारे होणारे ७५ टक्क्यांपेक्षा अधिक व्यवहार २ हजार रुपये आणि त्यापेक्षा कमी रकमेचे असतात.

**<><><><><>**

राज्यातल्या सहकारी साखर कारखान्यांना सवलतीचं कर्ज देण्यासाठी ७३८ कोटी रुपयांच्या तरतुदीला राज्य मंत्रिमंडळानं आज मंजुरी दिली. या अंतर्गत कारखान्यांनी घेतलेल्या कर्जावरचं दरसाल दर शेकडा १० टक्क्यांपर्यंतच व्याज राज्य सरकार भरणार आहेत. या कर्जाचा उपयोग गेल्या आणि आगामी गाळप हंगामातली FRP देण्यासाठी साखर कारखान्यांना करता येईल. २०१९ नंतर पहिल्यांदा राज्य सरकारनं अशा प्रकारची योजना आणली आहे.

नगर परिषद आणि नगरपंचायत निवडणुकांमध्ये निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी अर्ज फेटाळल्यानंतर त्याविरोधात आता जिल्हा न्यायालयात अपील दाखल करता येणार नाही. यासाठीच्या कायद्यात दुरुस्ती करुन अध्यादेश काढायला राज्य मंत्रीमंडळांनं आज मान्यता दिली.

राज्य मंत्रीमंडळाच्या बैठकीत आज राज्यातल्या दुष्काळजन्य परिस्थितीची चर्चा झाली. याविषयी मुख्यमंत्री म्हणाले

**होल्ड- मुख्यमंत्री बाइट**

राज्यात MH CET संदर्भात तक्रारींची चौकशी करण्यासाठी सरकारनं SIT स्थापन केली आहे. शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या शिष्टमंड़ळानं रविवारी यासंदर्भात मुख्यमंत्र्यांची भेट घेतली होती.

<><><><>

केवळ शिवसेना विधिमंडळ पक्षात फूट पडली, असा आपला दावा कधीच नव्हता, तर शिवसेना राजकीय पक्षातच फूट पडली, असंच आपलं म्हणणं आहे, असा युक्तिवाद शिवसेनेचे वकील ॲडव्होकेट नीरज किशन कौल यांनी आज सर्वोच्च न्यायालयासमोर केला. आता खऱ्या शिवसेनेचं प्रतिनिधित्व कोण करतं, हा प्रश्न असल्याचं त्यांनी सांगितलं.

शिवसेना पक्ष आणि पक्ष चिन्हाच्या संदर्भातल्या सुनावणीला आज पुन्हा सुरुवात झाली. पक्षाची घटना निवडणूक आयोगाकडे होती की नाही, हा प्रश्नच उद्भवत नाही. उद्धव ठाकरे यांच्या पक्षाचा भर ज्या घटनेवर आहे, त्या घटनेची नोंद आयोगाकडे नव्हती, त्यामुळे प्रदीर्घ वाटाघाटींनंतर १९९९ची घटना आयोगाकडे गेली आणि म्हणून आयोगानं ती विचारात घेतली, असं ॲडव्होकेट कौल म्हणाले. जर एखाद्या संघटनेच्या एका मोठ्या भागाचं कामकाज प्रभारी पद्धतीनं होत असेल, तर खरा पक्ष कोणता, हे ठरवताना ही बाब विचारात घ्यायचा अधिकार निवडणूक आयोगाला आहे, असंही ते म्हणाले. या प्रकरणाची पुढची सुनावणी उद्या होणार आहे.

<><><><>

देशातल्या १५ वर्षे आणि त्याहून अधिक वयोगटाचा बेरोजगारीचा दर ऑगस्टमध्ये किंचित घसरून ५ टक्क्यावर आला. ग्रामीण भागात तो कमी होऊन ४ पूर्णांक १ दशांश टक्क्यांवर आला. याउलट, शहरी भागातला बेरोजगारीचा दर किंचित वाढून ६ पूर्णांक ८ दशांश टक्क्यावर पोहोचला.

देशाचा 'कार्यबल सहभाग दर' ऑगस्टमध्ये वाढून ५२ पूर्णांक ८ दशांश टक्क्यावर पोहोचला. केंद्रीय सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयानं जारी केलेल्या मासिक श्रमशक्ती आणि बेरोजगारीच्या आकडेवारीनुसार, हा दर ग्रामीण भागात १ पूर्णांक ३ दशांश टक्क्यानी वाढून ५५ पूर्णांक ८ दशांश टक्के झाला, तर शहरी भागात अर्ध्या टक्क्यानं घसरून ४७ टक्क्यांवर आला आहे.

**<><><><><>**

दिल्ली मधल्या सत्य निकेतन इमारतीच्या अलीकडेच झालेल्या दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर दिल्ली सरकार १० हजार विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह उभारणार असल्याची माहिती दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी आज दिली. याबाबत संबंधित सरकारी विभागाशी चर्चा झाली असून वसतिगृहाची जागा निश्चित केली असल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं. शिक्षणासाठी दिल्लीत येणाऱ्या असंख्य विद्यार्थ्यांची सोय करण्यासाठी दिल्ली सरकार एक धोरण आखत असल्याची माहितीही गुप्ता यांनी यावेळी दिली.

**<><><><><>**

केंद्रीय ग्राहक संरक्षण प्राधिकरानं रॅपिडोला १० लाख रुपयांचा दंड ठोठावला आहे. दिशाभूल करणाऱ्या जाहिराती प्रसिद्ध करणं तसंच राइड्स नक्की करण्याआधी प्रवाशांना जास्तीचे पैसे भरायला लावणं अशा चुकीच्या गोष्टी केल्याबद्दल ही कारवाई करण्यात आली आहे.

**<><><><><>**

यमुना नदीचं पुनरुज्जीवन करण्यासाठी ६ राज्यांच्या मुख्यमंत्र्यांनी आज नवी दिल्ली इथं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या उपस्थितीत किशाऊ बहुद्देशीय धरण प्रकल्पाच्या करारावर स्वाक्षऱ्या केल्या. उत्तर प्रदेश, उत्तराखंड, हिमाचल प्रदेश, हरियाणा, राजस्थान आणि दिल्ली या ६ राज्यांमध्ये हा करार झाला.

किशाऊ बहुद्देशीय धरण प्रकल्पाला केंद्र सरकारनं राष्ट्रीय प्रकल्पाचा दर्जा दिल्याची माहिती शहा यांनी यावेळी दिली. या प्रकल्पाचा ९० टक्के खर्च केंद्र सरकार करेल आणि उर्वरित १० टक्के खर्च संबंधित राज्यं करतील, असंही ते म्हणाले.

<><><><>

पश्चिम बंगाल विधानसभेच्या २ जागांच्या पोटनिवडणुकीसाठी भाजपाने आज उमेदवारांची घोषणा केली. नंदीग्राम इथून हसिरानी रथ आणि रेजीनगरमधून सखराव सरकार यांना पक्षानं उमेदवारी दिली आहे. हसिरानी रथ या, मुख्यमंत्री सुवेंदू अधिकारी यांचे माजी स्वीय सहायक चंद्रनाथ रथ यांच्या आई आहेत. मे महिन्यात भाजपानं विधानसभा निवडणुकीत यश मिळवल्यानंतर काही दिवसांतच चंद्रनाथ रथ यांचा खून झाला होता.

<><><><>

अन्न आणि औषध प्रशासनानं  राबवलेल्या धडक कारवाईत जालना जिल्ह्यात १ कोटी ३५ लाख रुपयांचा गुटखा आणि इतर मुद्देमाल जप्त केला. गणेशोत्सवाच्या काळात राज्यभरात साडे पंधरा लाखापेक्षा जास्त रुपयांचे खाद्य पदार्थ जप्त केले. इतरत्र जप्त केलेल्या खाद्यपदार्थांमधे ३० लिटर दूध आणि सुमारे ४ हजार १३९ किलो दुग्धजन्यपदार्थांचा समावेश आहे.

या कारवाईत काही अन्न  आस्थापनांचे  परवाने निलंबित केले असून त्यात मुंबईतल्या ४, आणि  पुणे विभागातल्या २  नामांकित  आस्थापनांचा समावेश आहे.

<><><><>

श्रोतेहो, आशियाई खेळांवर आधारित विशेष कार्यक्रमाचं प्रसारण १६ ते १८ सप्टेंबरच्या दरम्यान आकाशवाणीवरुन रात्री ८ ते साडे ८ दरम्यान केलं जाणार

आहे. त्यामुळं उद्यापासून पुढचे ३ दिवस रात्रीचे राष्ट्रीय बातमीपत्र साडे ८ वाजता प्रसारित होईल.

**<><><><><>**

भारत आणि अफगाणिस्तान यांच्यातल्या ३ सामन्यांच्या टी-२० क्रिकेट मालिकेतला दुसरा सामना आज नवी दिल्लीत सुरू आहे. भारतानं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला आहे. शेवटची बातमी हाती आली तेव्हा अफगाणिस्तानच्या १० व्या षटकात ३ बाद ५९ धावा झाल्या होत्या.

**//<><><><><>//**